नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - २५७ Issue - 257 | वार सोमवार दि. ३ फेब्रुवारी २०२५ Blow- Monday Date 3 February 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# पुण्याचा पृथ्वीराज मोहोळ ठरला यंदाचा महाराष्ट्र केसरी

## सोलापूरचा महेंद्र गायकवाड पराभूत; मैदानात काही वेळ गोंधळाची परिस्थिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : अहिल्यानगरमध्ये आज (२ फेब्रुवारी) महाराष्ट्र केसरी स्पर्धा पार पडली. या सामन्यात पुण्याचा पैलवान पृथ्वीराज मोहळ यंदाच्या महाराष्ट्र केसरीचा मानकरी ठरला आहे. पैलवान पृथ्वीराज मोहळने पैलवान महेंद्र गायकवाडवर मात करत महाराष्ट्र केसरी किताब पटकावला आहे. पैलवान पृथ्वीराज मोहोळने अंतिम फेरीत बाजी मारत ६७ व्या महाराष्ट्र केसरी स्पर्धेची गदा पटकावली आहे.



पुण्याचा पैलवान पृथ्वीराज मोहळ यंदाच्या महाराष्ट्र केसरीचा मानकरी ठरल्यानंतर राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ, मंत्री दत्तात्रय भरणे, विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते पैलवान पृथ्वीराज मोहळला चांदीची गदा आणि थार गाडी देण्यात आली आहे. पृथ्वीराज मोहळने महाराष्ट्र केसरीची गदा जिंकल्यानंतर त्याच्या चाहत्यांनी मोठा जल्लोष केला.

अहिल्यानगरमध्ये महाराष्ट्र केसरी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. मात्र, आज (२ फेब्रुवारी) या स्पर्धेच्या उपांत्य फेरीचा सामन्यात मोठा गोंधळ झाल्याचं पहायला मिळालं. महाराष्ट्र केसरी स्पर्धेत अभूतपूर्व गोंधळ झाल्यामुळे स्पर्धेला गालबोट लागलं.उपांत्य फेरीचा सामन्यात पैलवान शिवराज राक्षेचा पराभव झाल्याचा निर्णय पंचांनी दिला. मात्र, पैलवान शिवराज राक्षेने पंचांनी दिलेल्या निर्णयाच्या विरोधात नाराजी व्यक्त करत पंचाला लाथ मारल्याचा आरोप करण्यात आला. पैलवान पृथ्वीराज मोहोळ आणि शिवराज राक्षे यांच्यात उपांत्य फेरीचा कुस्तीचा सामना रंगला होता. मात्र, पैलवान पृथ्वीराज मोहोळकडून शिवराज राक्षे पराभूत झाला. पण पराभूत होताच शिवराज राक्षेने पंचांना लाथ मारल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे मैदानात काहीवेळ गोंधळाची परिस्थिती पाहायला मिळाली. मात्र, त्यानंतर पोलिसांनी मध्यस्थी केल्याने वाद काहीसा निवाळला. यावेळी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे देखील त्या ठिकाणी उपस्थित होते. हा गोंधळ झाल्यानंतर शिवराज राक्षेने या सामन्याचा रिव्ह्यू घेण्याची मागणी केली होती.

# मराठीचा अनादर करणाऱ्यांची दादागिरी ठेचून काढू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



### मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांचा इशारा

पुणे : महाराष्ट्रात मराठीचा अनादर करणाऱ्यांची दादागिरी ठेचून काढू, असा इशारा मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी रविवारी दिला. येत्या पंधरवड्यात माझ्या विभागाअंतर्गत राज्यातील सर्व पोलीस अधीक्षकांची बैठक बोलावून त्यांना या संदर्भात सूचना करणार असल्याचेही त्यांनी सांगितले. भाषेच्या संवर्धनासाठी मराठी माणसावर होणाऱ्या अन्यायासंदर्भात राज ठाकरे आणि त्यांचा पक्ष करत असलेले काम कौतुकास्पद आहे. शासन म्हणून आम्ही त्यांच्या भूमिकेसोबत राहू, अशी ग्वाही सामंत यांनी दिली.

'आपलीच भाषा बोलली पाहिजे असा अन्य राज्यातील लोकांचा दबाव मुंबई, ठाणे, मुंब्रा, पुणे येथे काही लोक आणत आहेत. गेल्या तीन महिन्यांत हे प्रकार वाढल्याचे दिसून येत आहे. याबद्दलचा कायदा आहे. परंतु असा दबाव आणून मराठी भाषा बोलल्याबद्दल जर मारहाण होत असेल, तर हा कायदा कडक झाला पाहिजे', असे सामंत यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. या विषयासंदर्भात पोलीस अधीक्षकांच्या बैठकीनंतर आवश्यकता भासल्यास शासन अध्यादेश काढण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

माजी आमदार चंद्रकांत मोकाटे आणि महादेव बाबर यांची भेट हा 'मिशन टायगर'चा भाग नव्हता. पण, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदरापोटी कोणी पक्षात येऊ इच्छित असेल तर मिशनशिवायही ते येऊ शकतात, असे खुले आमंत्रण सामंत यांनी दिले.

निवडणुकीनंतर एकनाथ शिंदे हेच मुख्यमंत्री होतील, अशी घोषणा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केली होती, या ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी केलेल्या दाव्यासंदर्भात बोलताना सामंत म्हणाले, 'आता हे शहा यांना आणि ज्यांनी सांगितले त्यांना विचारले पाहिजे. राऊत यांना पत्रकार परिषद घेण्याचे व्यसन लागले आहे.' आता मी त्यांच्या वेळेच्या आधी पत्रकार परिषद घ्यावी म्हणतो आहे, अशी मिश्किल टिप्पणीही सामंत यांनी या वेळी केली.


उद्योग येत असलेल्या ठिकाणी चॅप्टर ६ जाहीर झाल्यानंतर खरेदी-विक्रीचे व्यवहार काही काळ होऊ नयेत अशा पद्धतीचा कायदा करण्याच्या मन:स्थितीत आम्ही आहोत. एकदा प्रकल्प झाल्यानंतर बाहेरच्या कोणाला त्या जमिनी खरेदी करता येणार नाहीत, असा नियम त्या कायद्यामध्ये अंतर्भूत असेल, उद्योगमंत्री उदय सामंत म्हणाले.

# 'इस्त्रो'च्या १००व्या मोहिमेला धक्का; 'एनव्हीएस०२' उपग्रहामध्ये तांत्रिक अडथळे

### भारतीय उपग्रह प्रक्षेपण, इस्त्रो मिशन अपयश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बंगळुरू : भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने (इस्त्रो) २९ जानेवारीला सोडलेल्या 'एनव्हीएस-०२' या दळवळण उपग्रहामध्ये तांत्रिक अडथळे आले आहेत असे 'इस्त्रो'च्या सूत्रांनी सांगितले. जीएसएलव्ही-एफ१५ या भूस्थिर उपग्रह प्रक्षेपण यान प्रक्षेपकाने सोडलेला 'एनव्हीएस-०२' त्याच्या नियोजित कक्षेत स्थिरावला होता. मात्र, त्याची कक्षा उंचावण्याच्या प्रयत्नांना यश आले नाही असे सूत्रांनी सांगितले.



'एनव्हीएस-०२'चे प्रक्षेपण ही 'इस्त्रो'ची शतकी कामगिरी असल्यामुळे त्याकडे देशवासीयांचे विशेष लक्ष होते. उड्डाण यशस्वी होऊन उपग्रह नियोजित कक्षेत पोहोचल्याचे 'इस्त्रो'ने जाहीर केले होते. मात्र, आता त्यामध्ये तांत्रिक अडथळे आल्याचे 'इस्त्रो'च्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे. यामुळे त्याचे कक्षा उंचावण्याच्या हालचाली बंद झाल्या आहेत. उड्डाणानंतर उपग्रहाचे सौर पॅनेल यशस्वीरित्या कार्यरत झाले आणि ऊर्जा निर्मिती नाममात्र आहे. उपग्रहाचे जमिनीवरील स्थानकाशी संभाषण प्रस्थापित करण्यात आले आहे. मात्र, त्यापुढील नियोजित कक्षेत उपग्रह जाण्याचे काम झाले नाही कारण वरील कक्षेत झेप घेण्यासाठी थ्रस्टरला बळ देण्यासाठी ऑक्सिडायझर दाखल करून घेण्यासाठी झडपा उघडल्या नाहीत, असे 'इस्त्रो'ने सांगितले. 'इस्त्रो'मधील सूत्रांनी सांगितले की उपग्रह कक्षेत पोहोचल्यानंतर तो पुढे झेपावण्यास अपयशी ठरला. उपग्रहाच्या प्रणाली निरोगी असून सध्या तो लंबवर्तुळाकार कक्षेत आहे. या लंबवर्तुळाकार कक्षेत दळणवळणासाठी उपग्रहाचा वापर करण्याच्या पर्यायी मोहिमेचा विचार केला जात आहे, असे 'इस्त्रो'ने स्पष्ट केले.

# राज्यातील ७८.४० टक्के शाळांमध्ये संगणक वाचन, गणित विषयात प्रगती; शालेय शिक्षण विभागाचा दावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील एकूण शाळांपैकी ७८.४० टक्के शाळांमध्ये संगणक उपलब्ध असून १ लाख ८ हजार ४४४ शाळांमध्ये संगणक वापराचे प्रमाण ७२.९५ टक्के, असा दावा शालेय शिक्षण विभागाकडून करण्यात आला आहे.



प्रथम एज्युकेशन फाऊंडेशन या संस्थेने एकूण शाळांच्या केवळ ०.८१ टक्के इतक्या शाळांचेच सर्वेक्षण केलेले आहे. राज्यात एकूण १ लाख ८ हजार १४४ शाळा आहेत. त्यापैकी केवळ ४०९ प्राथमिक आणि ४६३ उच्च प्राथमिक व त्यावरील ग्रामीण भागातील ८७२ शाळांचेच सर्वेक्षण संबंधित संस्थेकडून करण्यात आले आहे. राज्यातील एकूण २,०९,६१,८०० शालेय विद्यार्थ्यांपैकी केवळ ३३,७४६ मुलांचे सर्वेक्षण संस्थेने केले आहे जे की एकूण विद्यार्थ्यांच्या केवळ ०.१६ टक्के इतके आहे.

वय वर्ष ६ ते १४ मधील ६०.९ टक्के बालके ही शासकीय शाळांमध्ये शिक्षण घेत आहेत, तर ३८.५ टक्के बालके ही खासगी शाळांमध्ये शिक्षण घेत आहेत. इयत्ता पहिली व दुसरीमधील वाचन व गणितीय क्रिया यामध्ये विद्यार्थ्यांची संपादणूक व अध्ययन स्तर हा वाढला आहे.

शासकीय शाळांमध्ये सन २०२२ च्या तुलनेमध्ये सन २०२४ मध्ये वाचनामध्ये १०.९ टक्के प्रगती दिसून येते. तर खासगी शाळांमध्ये वाचनामध्ये ८.१ टक्के प्रगती दिसून येते. गणितीय क्रियांमध्ये शासकीय शाळांमध्ये १३.१ टक्के प्रगती दिसून येते व खासगी शाळांमध्ये ११.५ टक्के प्रगती दिसून येते.

इयत्ता तिसरीतील मुले जी इयत्ता दुसरीच्या पातळीचे वाचन करू शकतात याचे महाराष्ट्राचे प्रमाण देशपातळीपेक्षा १० टक्क्यांनी जास्त आहे. इयत्ता तिसरीमध्ये गणितीय क्रियांमध्ये विद्यार्थ्यांच्या प्रगतीमध्ये महाराष्ट्र हा देशातील पहिल्या पाच राज्यांमध्ये आहे. २०२२ च्या तुलनेमध्ये २०२४ मध्ये यात १३ टक्क्यांची वाढ दिसून येते.

इयत्ता पाचवीच्या मुलांमध्ये सन २०२२ च्या तुलनेमध्ये सन २०२४ मध्ये वाचनामध्ये २.२ टक्के अधिकची प्रगती झाल्याचे दिसून येते. सर्वात कमी शाळाबाह्य विद्यार्थी असणाऱ्या राज्यांमध्ये महाराष्ट्र हे एक राज्य आहे.

वय वर्ष १४ ते १६ मधील विद्यार्थ्यांच्या डिजिटल साधनांची उपलब्धतामध्ये राज्यातील ९४.२ टक्के विद्यार्थ्यांच्या घरी स्मार्टफोन आहे व यातील ८४.१ टक्के विद्यार्थी त्याचा वापर करू शकतात. यामधील १९.२ टक्के विद्यार्थ्यांनी स्वतःचा स्मार्टफोन असल्याचे नमूद केले आहे. यातील ६३.३ टक्के विद्यार्थी हे शिक्षणाच्या संदर्भात स्मार्टफोनचा वापर करतात, तर विविध सामाजिक माध्यमांसाठी ७२.७ टक्के विद्यार्थी स्मार्टफोनचा वापर करतात. पटनोंदणी दर ९९ टक्क्यांपेक्षा जास्त सन २०२४ मध्ये तीन वर्षांच्या पूर्व प्राथमिक शाळेमध्ये नोंदणी असणाऱ्या मुलांचे प्रमाण ९५ टक्के आहे, २०२२ मध्ये हे प्रमाण ९३.९ टक्के होते. महाराष्ट्रात ६ ते १४ वयोगटातील पटनोंदणी दर गेल्या ८ वर्षांपासून ९९ टक्क्यांपेक्षा जास्त आहे. महामारीच्या काळात शाळा बंद असूनही, २०१८ मधील ९९.२ टक्क्यांवरून एकूण पटनोंदणीचे आकडे २०२२ मध्ये ९९.६ टक्क्यांपर्यंत वाढले आहे आणि २०२४ मध्येसुद्धा स्थिर असल्याचे दिसून आले. म्हणजेच या वयोगटातील शाळाबाह्य मुलांचे प्रमाण ०.४ टक्के आहे, जे की देशभरात १.९ टक्के आहे, अशी माहिती शालेय शिक्षण विभागामार्फत देण्यात आली आहे.

### भारताचा इंग्लंडवर १५० धावांनी विजय

### १०० धावांच्या आत ऑल आऊट

# एकट्या अभिषेक शर्माने इंग्लंडला हरवलं; इंग्लिश संघाचा टी-२० मधील सर्वात वाईट पराभव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : अभिषेक शर्माच्या शतकाच्या जोरावर भारताने पाचव्या टी-२० सामन्यात इंग्लंडवर १५० धावांनी मोठा विजय नोंदवला आहे. अभिषेक शर्माने या सामन्यात १३५ धावांची धुव्वाधार खेळी केली. अभिषेक शर्मा फक्त शतक झळकावून थांबला नाही तर त्याने एकाच षटकात २ विकेट्स घेत विक्रम केला आहे. तर मोहम्मद शमीने ३ विकेट्स घेत आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये दणक्यात पुनरागमन केलं आहे.

भारताने दिलेल्या २४८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना अवघ्या ९७ धावांवर सर्वबाद झाला. भारताकडून एकट्या अभिषेक शर्माने १३५ धावांची वादळी खेळी केली. इंग्लंडचे ११ खेळाडूही १३५ धावांचा टप्पा गाठू शकला नाही आणि १०० धावांच्या आतच इंग्लिश संघ सर्वबाद झाला. मालिका आधीच काबीज केलेल्या टीम इंडियाने शेवटच्या सामन्यात इंग्लंडचा एकतर्फी १५० धावांच्या मोठ्या फरकाने पराभव केला. इंग्लंडचा धावांच्या बाबतीत हा सर्वात वाईट पराभव आहे.




भारताने नाणेफेक गमावल्यानंतर प्रथम फलंदाजी करण्यासाठी उतरला आणि पहिल्याच चेंडूपासून तुफानी फटकेबाजी करण्यास सुरूवात केली. संजू सॅमसनने पहिल्याच षटकात १६ धावा केल्या पण पुढच्याच षटकात तो बाद झाला. मात्र अभिषेक शर्माने दुसऱ्या बाजूने आक्रमण सुरूच ठेवत आपली तुफानी फटकेबाजी सुरूच ठेवली.

अभिषेकने विशेषत: जोफ्रा आर्चर आणि जेमी ओव्हरटन यांच्याविरूद्ध जोरदार फटकेबाजी केली आणि पॉवरप्लेमध्ये अवघ्या १७ चेंडूत आपले अर्धशतक पूर्ण केले. या फॉरमॅटमध्ये भारताचे हे दुसरे सर्वात वेगवान अर्धशतक आहे. टीम इंडियाने पहिल्या ६ षटकात ९५ धावा केल्या होत्या. अभिषेकची वादळी फलंदाजी सुरूच होती आणि त्याने ११व्या षटकात ३७ चेंडूत शतक पूर्ण केले. रोहित शर्मानंतर अभिषेक शर्माने भारतासाठी दुसरे सर्वात जलद शतक झळकावले.

१८व्या षटकात बाद होण्यापूर्वी अभिषेकने केवळ ५४ चेंडूत १३५ धावा केल्या, ज्यात १३ षटकार आणि ७ चौकारांचा लगावले. त्याच्याशिवाय शिवम दुबे आणि तिलक वर्मा यांनीही लहान पण वेगवान खेळी खेळल्या. इंग्लंडकडून ब्रेडन कार्सने ३ विकेट घेतले.

इंग्लंडने २४८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना चांगली सुरूवात केली आणि पहिल्याच षटकात फिल सॉल्टने मोहम्मद शमीविरूद्ध २ चौकार आणि १ षटकारासह वादळी सुरूवात केली. पण त्याला दुसऱ्या टोकावरून चांगली साथ मिळाली नाही. तिसऱ्या षटकात बेन डकेटला शमीने पहिल्याच चेंडूवर माघारी धाडले, तर पाचव्या षटकातच कर्णधार जोस बटलरला वरुण चक्रवर्तीने बाद केले. सॉल्ट दुसऱ्या बाजूने फटकेबाजी करत होताच आणि त्याने २१ चेंडूत अर्धशतकही ठोकले पण बाकीचे फलंदाज वरुण आणि रवी बिश्नोईपुढे शरणागती पत्करताना दिसले.

त्यानंतर ८व्या षटकात शिवम दुबेने सॉल्टला (५५) बाद करून इंग्लंडच्या आशा धुळीस मिळवल्या. यानंतर अभिषेकने एकाच षटकात दोन विकेट घेत इंग्लंडच्या पराभवावर शिक्कामोर्तब केला, यानंतर शमीने ११व्या षटकात सलग दोन विकेट घेत इंग्लंडला पराभूत केलं. टीम इंडियाकडून शमीने सर्वाधिक ३ विकेट घेतले, तर दुबे, अभिषेक आणि वरुणने प्रत्येकी २ विकेट घेतले. अशा प्रकारे टीम इंडियाने मालिका ४-१ ने आपल्या नावे केली आहे.

## संपादकीय....

### शेतकऱ्यांसाठी क्रेडिट कार्ड

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण आज लोकसभेत आर्थिक वर्ष २०२४-२०२५ चा देशाचा अर्थसंकल्प सादर करत आहेत. हा अर्थसंकल्प देशातील गरीब, शेतकरी आणि महिलांना समर्पित आहे असे सुरुवातीलाच जाहीर करण्यात आले आहे. याचवेळी केंद्र सरकारने अर्थसंकल्पातून शेतकऱ्यांना मोठं गिफ्ट दिलं आहे. लोकसभेत निर्मला सीतारमण यांनी अर्थसंकल्प सादर करताना, शेतकऱ्यांसाठी एक मोठी घोषणा केली, ती म्हणजे किसान क्रेडिट कार्ड मर्यादा वाढवण्यात आली आहे. या अर्थसंकल्पातून शेतकऱ्यांसाठी अनेक मोठ्या घोषणा करण्यात आल्या, यावेळी त्यांनी किसान क्रेडिट कार्ड लिमिट वाढवण्यात येणार असल्याचं घोषित केलं. यामुळे शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या किसान क्रेडिट कार्डची मर्यादा आता तीन लाख रुपयांवरून पाच लाख रुपये करण्यात आली आहे, ज्यामुळे क्रेडिट कार्डच्या माध्यमातून देशातील सात कोटी शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. यामुळे शेतकऱ्यांना आता सहजपणे कर्ज मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. किसान क्रेडिट कार्ड ही केंद्र सरकारची योजना असून छोट्या शेतकऱ्यांसाठी ती वरदान ठरली आहे. याद्वारे शेतकऱ्यांना विनातारण १.६ लाख रुपयांचं कर्ज मिळू शकतं, तर तीन वर्षांत यातून पाच लाखांपर्यंत कर्ज शेतकरी घेऊ शकतात. यासाठी वार्षिक चार टक्के व्याजदर आकारण्यात येतो. मात्र, या योजनेचा फायदा घेण्यासाठी तुम्हाला पीएम किसान सन्मान निधीत खातं खोलणं गरजेचं आहे. किसान क्रेडिट कार्डच्या माध्यमातून शेतकरी ५ वर्षांत ५ लाखांपर्यंत अल्पमुदतीतील कर्ज घेऊ शकतात. या कार्डसाठी ९ टक्के इतका वार्षिक व्याजदर आहे. मात्र, सरकार यावर २ टक्के अनुदान देतं, त्यामुळे हा व्याजदर ७ टक्के होतो. त्याचबरोबर जर शेतकऱ्यानं या कर्जाची वेळेत परतफेड केली तर त्याला ३ टक्क्यांची आणखी सूट मिळते. म्हणजेच शेतकऱ्याला त्याचं कर्ज हे केवळ ४ टक्के व्याजदरानेच उपलब्ध होतं. किसान क्रेडिट कार्डची मुदत ही ५ वर्षांसाठी असते.

# नागरिकानो टी.बी रुग्णांना सहानुभूती आणि समर्थन द्या : प्रदिप पट्टेबाहदुर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वाशिम प्रतिनिधी : दि.२ डिसेंबर टीबी (क्षय रोग) हा एक गंभीर आणि संक्रामक रोग आहे. त्यामध्ये व्यक्तीला शारीरिक कष्ट,मानसिक त्रास आणि सामाजिक वेगळेपणाचा सामना करावा लागतो. टीबीच्या रुग्णांशी सहानुभूती दाखवणे अत्यंत महत्त्वाचे असे मत जिल्हा युवा पुरस्कार प्राप्त महाराष्ट्र शासन तथा मा.राष्ट्रिय युवा कोर ने.यु.के.भारत सरकार प्रदिप पट्टेबाहदुर आपल्याला राजा प्रसेनजित संस्था व नेहरू युवा बहुउद्देशीय मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने मटले आहे. टीबी १०० दिवस विशेष शोध मोहिमेच्या अनुषंगाने नागरिकांनी क्षयरोग विभाग कर्मचारी तथा ग्राम पातळीवर कार्य करणारे आरोग्य कर्मचारी यांना देखील सहकार्य केले पाहिजे. त्याचबरोबर त्यासाठी नागरिकानी काही गोष्टींचा विचार केला पाहिजे समजून घेणं आणि सहकार्य करणे टीबी रुग्णांना समजून घ्या. त्यांचे दु:ख आणि संघर्ष ओळखा. त्यांच्या शारीरिक आणि मानसिक त्रासाबद्दल संवेदनशील रहा.




मानसिक समर्थन टीबीचे उपचार दीर्घकालीन असू शकतात, त्यामुळे रुग्णांना मानसिक आधाराची आवश्यकता असते. त्यांना उत्तम सल्ला देणे, हिम्मत वाढवणे आणि आशा दाखवणे आवश्यक आहे.

वैयक्तिक स्वच्छता आणि आरोग्य टीबीच्या रुग्णाच्या आजारापासून इतरांना वाचवण्यासाठी आवश्यक सावधगिरी बाळगा. परंतु, त्याच्या आजारामुळे त्याला वाईट वागणूक देणे किंवा त्याला वगळणे योग्य नाही. सामाजिक समर्थन रुग्णाला सामाजिक व मानसिक आधार आवश्यक आहे. त्याला एकटे वगळू नका, त्याच्याशी संवाद साधा, त्याला सहकार्य करा आणि त्याचे मानसिक आरोग्य सांभाळा सकारात्मक दृषटिकोन रुग्णाच्या उपचार प्रक्रियेत त्यांच्या सकारात्मक दृषटिकोनाचा मोठा प्रभाव होऊ शकतो. त्याला आशा आणि सकारात्मकता देण्याची आवश्यकता आहे. टीबी रुग्णांसाठी सहानुभूती आणि समर्थन देणे त्यांच्यासाठी चांगले मानसिक आरोग्य आणि उपचारासाठी महत्त्वाचे आहे.

टीबी (क्षय रोग) रुग्णांसाठी सरकार विविध प्रकारे मदत पुरवते. हे समर्थन रुग्णाच्या उपचाराच्या प्रक्रियेत आणि त्याच्या जीवनातील इतर पैलूंमध्ये मदत करते. सरकारी मदतीचे काही मुख्य प्रकार मुक्त उपचार सेवा

भारत सरकारच्या राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम (ठछढउझ) अंतर्गत, टीबी रुग्णांसाठी सरकारी रुग्णालयांमध्ये मुक्त उपचार दिले जातात. यामध्ये तपासणी, आवश्यक औषधे आणि उपचार मोफत दिले जातात.औषधांची मोफत उपलब्धता:

सरकार टीबी उपचारासाठी आवश्यक असलेली औषधं मोफत पुरवते. हे औषधे नियमितपणे वितरित केली जातात, जे रुग्णाच्या उपचाराची प्रक्रिया सुरळीत ठेवण्यास मदत करतात.आरोग्य सेवा आणि जागरूकता सरकारी आरोग्य संस्थांमध्ये टीबीबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी शिबिरे, कार्यशाळा आणि माहिती दिली जाते. तसेच, सरकारने टीबीसाठी तपासणी केंद्रे सुरू केली आहेत.आर्थिक सहाय्य आणि जीवनमान सुधारणा

काही राज्यांमध्ये, टीबी रुग्णांना आर्थिक मदत देण्यासाठी योजनाही सुरू करण्यात आलेल्या आहेत. उदाहरणार्थ, काही राज्ये रुग्णांना उपचार करत असताना काही प्रमाणात जीवनावश्यक सामग्री किंवा भत्ता पुरवतात. आहार आणि पोषण रुग्णांच्या शारीरिक स्थितीला चांगले पोषण मिळवण्यासाठी सरकार विविध पोषण योजना सुद्धा राबवते.घरपोच सेवा काही ठिकाणी सरकारने टीबी रुग्णांच्या उपचारांच्या पुढाकारासाठी घरपोच औषध सेवा सुरू केली आहे. यामुळे रुग्णांना नियमितपणे औषधं मिळतात आणि उपचाराची प्रक्रिया सोपी होते. समाजातील भेदभाव टाळणे: सरकार आणि विविध स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून टीबी रुग्णांविरोधात असलेला सामाजिक भेदभाव कमी करण्यासाठी प्रयत्न केले जातात. टीबी रुग्णांना सरकारी मदत मिळवण्यासाठी स्थानिक आरोग्य केंद्र, सरकारी रुग्णालय किंवा संबंधित विभागाच्या संपर्कात राहून तपासणी, औषधे आणि इतर सेवा मिळवता येतात. त्यासाठी आपण योग्य सल्ला घ्यावा गावातील अशा सेविका अथवा गावातील सरकारी रुग्णालय जवळच्या तालुका किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी जाऊन क्षयरोग विभागाला भेट घेण्या साठी आपक मदत करावी.

**– प्रदिप क.पट्टेबहादुर**
जिल्हा युवा पुरस्कार प्राप्त
महाराष्ट्र शासन तथा मा. राष्ट्रीय युवा कोर (छधघड)भारत सरकार – नेहरु बहुउद्देशीय मंडळ व राजा प्रसेनजित संस्था केकतउमरा
मो.८७६६५५८०८८

# आवताडे शुगर कार्यस्थळावर क्षयरोग व सर्व रोग निदान शिबीर संपन्न




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आवताडे शुगर अँड डिस्टिलरीज प्रा.ली. नंदूर या साखर कारखान्याचे चेअरमन संजय आवताडे यांच्या संकल्पनेतून कारखाना कार्यस्थळावर ऊस तोडणी कामगार व कारखान्यातील कर्मचारी यांच्यासाठी क्षयरोग व सर्व रोग तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराच्या प्रारंभी कारखान्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुर्मदास चटके व कार्यकारी संचालक मोहन पिसे यांच्या हस्ते माघी गणेश जयंती निमित्त श्री.गणेशाच्या प्रतिमेचे पूजन करून या शिबिराला सुरवात करण्यात आली.

शारीरिक आणि मानसिक दृष्ट्या ऊसतोड कामगार व कर्मचारी यांचे आरोग्य सदृढ आणि सक्षम होण्यासाठी आशा आरोग्य उपक्रमांचे नितांत गरज असल्याचे प्रतिपादन मुख्य कार्यकारी अधिकारी चटके यांनी यावेळी बोलताना व्यक्त केले. कारखानदारी कार्यक्षेत्रामध्ये आपली व्यावसायिक जबाबदारी पार पाडत असताना समाजातील विधायक कार्यक्रमांना गतिमान करण्यासाठी अशा कार्यक्रमांचे उपक्रमाचे कारखाना मार्फत वेळोवेळी आयोजन केले जाते असेही त्यांनी आवर्जून यावेळी नमूद केले. या शिबीरात ३५५ कारखाना कामगार, ऊस तोडणी मजुर व त्यांचे बालक यांची आरोग्य तपासणी झाली. या शिबीरासाठी डॉ.श्री डी. जी शिंदे (वैद्यकीय अधिकारी), डॉ. श्री नंदकुमार शिंदे (वैद्यकीय अधिकारी), डॉ अरुणकुमार महिंद्रकर (अस्थीरोग्य तज्ञ), डॉ. श्रेयश जाधव (एम.डी मेडीशियन), डॉ. गौरीशंकर बुगडे, डॉ.महेश माळी, डॉ. सिद्राया बिराजदार, डॉ. आनंद हत्तरसंग तसेच आरोग्य केंद्रातील कर्मचारी, आरोग्य सेवक यांनी आपली समाजाभिमुख कर्तव्य सेवा पार पाडत असताना अतिशय समर्पक भावनेने सर्व कर्मचारी व कामगारांची तपासणी करून योग्य तो आरोग्यविषयक सल्ला दिला.

या कार्यक्रमासाठी कारखान्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुर्मदास चटके, कार्यकारी संचालक मोहन पिसे,माजी संचालक भारत निकम, सरव्यवस्थापक(टेक्नीकल) सुहास शिनगारे, चिफ केमिस्ट मोहन पवार, एच आर मॅनेजर डी. बी. बळवंतराव, डिस्टलरी मॅनेजर संभाजी फाळके, चिफ अकोंटंट बजीरंग जाधव, शेती अधिकारी राहुल नागणे, उपशेती अधिकारी तोहीद शेख, ऊस पुरवठा अधिकारी दामोदर रेवे, ईडीपी मॅनेजर निलेश रणदिवे, सुरक्षा अधिकारी चंद्रकांत राठोड उप सुरक्षा अधिकारी रणजीत पवार आदी मान्यवर सहकारी तसेच सर्व कारखाना प्रशासकीय अधिकारी पदाधिकारी, खाते प्रमुख, कर्मचारी आणि कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिक्षण क्षेत्रात डिजिटल आणि एआयचा समावेश: विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी क्रांतिकारी अर्थसंकल्प

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वात केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी या अर्थसंकल्पात शिक्षणाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन देशातील शेतकरी, नोकरदारवर्ग,कष्टकरी, व्यापारी, उद्योजक, महिला, युवक, विद्यार्थी, सर्वसामान्य माणूस केंद्रबिंदू मानून सादर केलेल्या अर्थसंकल्पातून देशातल्या प्रत्येक व्यक्तीला विकासाची संधी, प्रत्येक समाज घटकाला बळ आणि विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी ख सारख्या नवीन तंत्रज्ञानाची जोड देऊन देशाला आर्थिक महासत्ता आणि विकसित राष्ट्र बनण्याच्या वाटेवर नेणारा हा अर्थसंकल्प मांडला, अशी प्रतिक्रिया उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटीलयांनी दिली. या अर्थसंकल्पात शिक्षण क्षेत्रासाठी १.२८ लाख करोड रुपयांची भरीव तरतूद करण्यात आली आहे. यामध्ये ५०,०६७ करोड रुपये केवळ उच्च शिक्षणासाठी तरतूद करण्यात आली आहे. मेडिकलच्या एका वर्षात १० हजार आणि पुढील ५ वर्षात ७५ हजार जागा वाढवण्यात येणार आहेत. उच्च शिक्षण विभागामध्ये डिजिटल संसाधनांची सुरुवात करण्यासाठी ‘ भारतीय भाषा पुस्तक ‘ ही योजना राबविण्यात येणार आहे. उच्च शिक्षण संस्थांना भारतीय भाषेतील पुस्तकांची डिजिटल आवृत्ती प्रदान करणे हे या योजनेचे वैशिष्ट्य आहे.

याशिवाय आयआयटी पाटणा चा विस्तार आणि ५ नवीन आयआयटी मध्ये अतिरिक्त पायाभूत सुविधा निर्माण करण्यावर भर देण्यात आला आहे. आयआयटीचे आणखी ६ हजार ५०० जागा वाढवण्यात येणार आहेत. संशोधनासाठी १० हजार फेलोशिप दिल्या जाणार आहेत तसेच विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन वाढवण्यासाठी अटल टिंकरिंग लॅब्सचा स्थापना करून पुढील ५ वर्षात ५०, हजार लॅब्सची स्थापना करण्यात येणार आहे. या अर्थसंकलपात कृत्रिम बुद्धिमत्ता (ख) संदर्भात देशभरात तीन कृत्रिम बुद्धिमत्ता केंद्र स्थापित करण्याची घोषणा केली आहे. या केंद्रांचे उद्दीष्ट ख तंत्रज्ञानाच्या विकासासाठी एक ठोस पायाभूत सुविधा तयार करणे आणि उद्योगांसाठी महत्त्वपूर्ण संशोधन करणे आहे. देशात ख तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण प्रगतीसाठी एक मजबूत पाया तयार केला आहे, ज्यामुळे उद्योग आणि अर्थव्यवस्था अधिक डिजिटल आणि तंत्रज्ञानावर आधारित होईल.असेही उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले.

# डुबेरे जनता विद्यालयाचे उपशिक्षक अरुण डावरे यांचा सेवापूर्ती सोहळ्याचा कार्यक्रम संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर/प्रतिनिधी : डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे उपशिक्षक अरुण डावरे हे आपल्या ३० वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाले असून त्यांचा सेवापूर्तीचा सोहळा मविप्र समाज संस्थेचे संचालक कृष्णाजी भगत यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे पतसंस्थेचे संस्थापक चेअरमन नारायण शेठ वाजे होते . व्यासपीठावर उच्च माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष विठ्ठल वामने,शालेय समितीचे सदस्य भाऊ वारुंगसे, विजय वाजे,माजी सरपंच शरद माळी, अर्जुन वाजे, विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन अशोकराव गवळी माजी मुख्याध्यापक किशोर जाधव, शांताराम चांदोरे, पर्यवेक्षक शिवनाथ पांगारकर,विद्यालयाचे मुख्याध्यापक रामदास वाजे ,रामनाथ मोरे,वैभव मोरे आदी मान्यवर उपस्थित होते.



मुख्याध्यापक रामदास वाजे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले.

मानसी जाधव, अंकिता ढोली, पायल उगले या विद्यार्थ्यांसह प्रकाश डावरे ,कल्पना शिंदे, माजी मुख्याध्यापक बी.एम.पवार, माजी पर्यवेक्षक एकनाथ खैरनार, व्ही. के.राजोळे, प्रियंका मोरे यांनी सरांविषयी आपले मनोगत व्यक्त केले.त्यानंतर सत्कारमूर्ती अरुण डावरे व सौ.सविता डावरे यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

सत्काराला उत्तर देतांना डावरे सर म्हणाले की,कर्मवीरांच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन सदैव विद्यार्थ्यांसाठी काम केले. आई -वडीलांच्या संस्काराची शिदोरी माझ्या बरोबर होती त्यामुळेच मला काम करणे सोपे गेले. मला माझ्या सरका-यांनी खुप सहकार्य केले त्यामुळेच मी चांगले काम करू शकलो.

अध्यक्षीय भाषणात नारायण वाजे म्हणाले की, डावरे सरांनी विद्यार्थी व संस्था दैवत मानून अतिशय प्रामाणिकपणे चांगले कामकाज केले. डावरे सर हे विद्यार्थीप्रिय व शिक्षकप्रिय होते. त्यांनी आपले तन,मन,धन अर्पून काम केले.आदर्श शिक्षक म्हणून त्यांचे काम आदर्शवतच राहतील. त्यांच्या कार्याचा इतरांनी आदर्श घ्यावा असे आवाहन वाजे यांनी केले.

सूत्रसंचालन पी.आर.करपे यांनी केले तर आभार प्रदर्शन सोमनाथ गिरी यांनी केले.कार्यक्रमास शालेय सदस्य,पालक-शिक्षक व माता-पालक सदस्य, हितचिंतक, शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# रेशीम शेतीची आस धरा, लक्ष्मी येईल तुमच्या घरा

आपल्या देशात रेशीम धाग्याची मागणी जास्त असून उत्पादन कमी असल्याने रेशीम धागा इतर देशातून आयात करावा लागतो. त्यामुळे रेशीम उत्पादन वाढविण्यास आपल्याला चांगला वाव आहे. तुती रेशीम उद्योग हा प्रामुख्याने महाराष्ट्रातील २७ जिल्ह्यांमध्ये चालू आहे. टसर रेशीम उद्योग प्रामुख्याने पूर्व विदर्भातील भंडारा, गोंदिया, गडचिरोली व चंद्रपूर या जिल्ह्यात पारंपारिक पद्धतीने चालू असून यातून आदिवासी भागातील शेतकऱ्यांना उत्तम जोडधंदा लाभला आहे.

नैसर्गिक रेशीम धाग्याला त्याच्या मुलायमप्रमाणे ‘वस्त्रोद्योगाची राणी’ असे संबोधण्यात येते. रेशीम कोष उत्पादन झाल्यानंतर त्यापासून रेशीम धागा निर्मिती करुन वस्त्र निर्मिती केली जाते. शासनामार्फत या योजनेचा विस्तार व विकासासाठी अनेक योजना राबविण्यात येत आहेत. शेतीसाठी असलेल्या विविध योजनांचा लाभ घेऊन त्यांचे आर्थिक उत्पन्नात भर पडावी हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे. शासनाच्या वस्त्रोद्योग विभागामार्फत व रेशीम संचालनालय, नागपूर यांचे मार्गदर्शनाखाली हा प्रकल्प राबविण्यात येत आहे.

नैसर्गिक रेशीम धाग्याची निर्मिती रेशीम अळीच्या कोषापासून होते. निसर्गात ४ प्रकारच्या रेशीम अळ्या आढळतात. मोठ्या प्रमाणावर तुती रेशीम कोष उत्पादन घेण्यासाठी तुतीच्या झाडांची सलग लागवड करावी लागते. तुतीच्या झाडांची पाने खाऊ घालून रेशीम कोष उत्पादन करणे याला ‘रेशीम शेती’ म्हणतात. हा एक कुटीर उद्योग असून शेतीला उत्तम पूरक जोडधंदा आहे. रेशीम अळ्यांचे संगोपन हे संगोपन गृहामध्ये करावयाचे असते. याकरिता संगोपन साहित्य व आदर्श पक्के संगोपन गृह बांधणे आवश्यक आहे.

रेशीम कोष उत्पादन व्यवसाय हा महत्त्वपूर्ण आहे कारण शेतीला उत्कृष्ट जोडधंदा आहे. अल्प कालावधीचे पीक असल्यामुळे पाल्याचे योग्य व्यवस्थापन केल्यास दुसऱ्या वर्षापासून वार्षिक किमान पाच पिके घेता येतात. तुती लागवड केल्यानंतर १०ते १५ वर्षापर्यंत पुन्हा लागवड करण्याची गरज नाही. तुतीच्या फांद्या व अळ्यांच्या विष्ठेपासून उत्तम सेंद्रिय खत निर्मिती करता येते. घरातील व्यक्तीद्वारे सहज व सुशिक्षित बेरोजगार यांनी करण्यासारखा उद्योग आहे. इतर पिकांच्या तुलनेत



पाणी कमी लागते. या व्यवसायात महिलांचा ५० ते ६० टक्के सहभाग आहे. शिवाय पर्यावरण पुरक व्यवसाय आहे.

**करा रेशीम शेती, पिकवा मातीतून मोती**

रेशीम कोष खरेदी किमान आधारभूत किंमत व इतर राज्यात विकण्यास सुद्धा मुभा आहे. शिवाय तुतीचा शिल्लक पाला जनावराचे उत्तम खाद्य आहे. विद्यावेतनासह रेशीम शेती प्रशिक्षण, तांत्रिक मार्गदर्शन व सवलतीचे दरात अंडीपूंज पुरवठा देखील करण्यात येतो. रेशीम कोष उत्पादन करणेसाठी शेतकऱ्यांकडे किमान एक एकर उत्तम पाण्याचा निचरा होणारी व बारमाही ओलीत असलेली जमीन असणे आवश्यक आहे. मात्र तुतीची लागवड इतर पिकांमध्ये करु नये. दुसऱ्या वर्षापासून ५०० ते ६००किलो कोषचे दिड ते दोन लाख रुपयांचे उत्पन्न मिळते. ४०ते ५० हजार पर्यंत खर्च येतो. म्हणजेच १ लाख ते १.५ लाख रुपये निव्वळ नफा एक एकर पासून मिळवता येतो.

नुकतेच अमरावतीचे जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी रेशीमरथाला हिरवी झेंडी दाखवून महारेशीम अभियान-२०२५ चे उद्घाटन केले. रेशीम रथाचा उद्देश तुती रेशीम उद्योग, रेशीम शेतीचे महत्त्व व त्यातून मिळणाऱ्या हमखास व शाश्वत उत्पन्नाची शेतकऱ्यांना माहिती हवी तसेच शेतकऱ्यांना रेशीम शेतीसाठी नोंदणी करता यावी, यासाठी जनजागृती व्हावी, हा होय. चित्ररथाव्दारे अमरावती जिल्ह्यातील १४ तालुक्यातील ७८ गावात रेशीम उद्योगाचा प्रचार व प्रसिद्धी मोहीम तसेच नवीन गावे व शेतकरी निवड व नोंदणी कार्यक्रम राबविण्यात येत आहे. तुती रेशीम उद्योग हा शेतीला उत्तम जोडधंदा आहे. जास्तीत -जास्त शेतकऱ्यांनी रेशीम शेतीचे महत्त्व जाणून तुती रेशीम उद्योग करण्यावर भर द्यावा.

**– अपर्णा यावलकर,** माहिती अधिकारी
अमरावती.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble


■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

दैनिक
यश सिद्धि न्यूज



# वसंत पंचमीच्या शुभ मुहूर्तावर श्री विठ्ठल रुक्मिणीमातेचा शाही विवाह सोहळा संपन्न

## विवाह सोहळ्यासाठी भाविकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : आज ०२ फेब्रुवारी रोजी वसंत पंचमीच्या शुभ मुहूर्तावर श्री विठ्ठल व श्री रुक्मिणी मातेचा विवाह सोहळा परंपरेनुसार श्री विठ्ठल सभा मंडप येथे संपन्न झाला.

असा पार पडला विवाह सोहळा।

सकाळी श्री विठ्ठल रुक्मिणीमातेला शुभ्र वस्त्र तसेच श्री.रुक्मिणी मातेस मोत्याचे दागिने, नथ आणि अलंकार परिधान करण्यात आले होते. श्री. रुक्मिणी मातेच्या गर्भागृहातून गुलाल श्री.विठ्ठलाकडे नेण्यात आला. तिथे गुलालाची उधळण केल्यानंतर श्री विठ्ठलाचा गुलाल रुक्मिणी मातेकडे नेण्यात आला. तिथेही गुलालाची उधळण करण्यात आली.

दुपारी १२ वाजता श्री.विठ्ठल रूक्मिणीमातेची पाद्यपुजा सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, सदस्य ह.भ.प. ज्ञानेश्वर देशमुख जळगावकर, संभाजी शिंदे, व्यवस्थापक मनोज श्रोत्री, लेखा अधिकारी मुकेश अनेचा यांच्या शुभहस्ते पार पडली.

त्यानंतर श्री विठ्ठल व श्री रुक्मिणी मातेची अलंकाराने सजवलेली उत्सवमूर्ती या विवाह सोहळय़ाच्या ठिकाणी म्हणजे श्री.विठ्ठल सभामंडपातील फुलांनी सजविण्यात आलेल्या शाही मंडपात आणण्यात आली. दोन्ही देवतास मुंडावळ्या बांधून आणल्या गेल्या. यानंतर अंतरपाट धरले आणि मंगलाष्टकास सुरवात झाली. त्यामध्ये मंदिर समितीचे सह अध्यक्ष श्री गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी मंगलाष्टका म्हटली. मंगलाष्टक झाल्यावर सर्व उपस्थित भाविकांनी शाही विवाह सोहळा साजरा केला.

यावेळी मंदिर समितीमार्फत संत तुकाराम भवन येथे भोजनाची व्यवस्था भाविकांसाठी करण्यात आली होती. विवाह सोहळा पार पडल्यानंतर मोठ्या प्रमाणात भाविकांनी या प्रसादाचा लाभ घेतला. असल्याची माहिती मंदिर समितीची व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

## थोडक्यात...

### चोरट्यांकडून आठ दुचाकी जप्त शहर गुन्हे शाखेची कामगिरी: आठ जणांना अटक

सोलापूर : वाहन चोरी करणाऱ्या सात जणांना शहर गुन्हे शाखेकडून अटक करण्यात आली. त्यांच्याकडून तीन लाख १५ हजार रुपये किमतीच्या आठ व सोने चोरीचा एक असे एकूण नऊ गुन्हे उघडकीस




आणून पाच लाख ९ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. जोडभावी पेठ पोलीस ठाण्यातील दोन, सदर बझार पोलिस ठाण्यातील चार, जेलरोड पोलीस ठाण्यातील दोन असे एकूण आठ व इतर सोने चोरीचा एक गुन्हा उघडकीस आणण्यात शहर गुन्हे शाखेच्या पथकाला यश आले आहे.

यात अधिक माहिती अशी की, शहर गुन्हे शाखेतील पोलीस उपनिरीक्षक अल्फाज शेख व त्यांच्या पथकातील पोलिस अंमलदार यांनी शहर परिसरात पेट्रोलिंग करताना त्यांना प्राप्त झालेल्या गोपनीय बातमीदाराच्या आधारे संशयित आरोपी अय्यप्पा माळाप्पा पारट, विशाल शेटीबा देवकर, नागेश भीमाशंकर पाटील, चंद्रशेखर संगप्पा गुब्याडकर, ऋतिक उर्फ डेविड शंकर गायकवाड, उमेश नागनाथ भोसले असे एकूण सहा आणि एक विधी संघर्ष बालक (सर्व रा. सोलापूर) यांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी शहर परिसरातील पोलीस ठाण्याच्या हद्दीतून चोरी गेलेल्या मोटरसायकल चोरी केल्याची कबुली दिली. त्याचप्रमाणे संशयित आरोपी व्यंकटेश वीर मोहन अरकाल (वय ४०, रा. गिरी झोपडपट्टी, दत्तनगर) याला ताब्यात घेऊन त्याच्याकडे चौकशी केली असता तीन तोळे वजनाचे सोन्याचे ब्रेसलेट चोरी केल्याची कबुली दिली. अशा प्रकारे शहर गुन्हे शाखेतील पथकाने मोटरसायकल चोरीची आठ व इतर चोरीचा एक असे नऊ गुन्हे उघडकीस आणून एकूण पाच लाख नऊ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

### दुचाकीची महिलेस धडक एकावर गुन्हा

सोलापूर, (प्रतिनिधी) : दुचाकीच्या धडकेत महिला जखमी झाल्याची घटना भद्रावती पेठ येथे दिनांक २९ जानेवारी रोजी सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास घडली.याप्रकरणी छबुबाई तुकाराम जगताप (वय-५०,रा.राहुल गांधी,झोपडपट्टी) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून आयान जलाल बागवान (वय-२०,रा.सुनील नगर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की,वरील संशयित आरोपी याने त्याच्या भागातील दुचाकी क्रमांक एमएच.१३. डीएफ.९०१६ यावरून ट्रिपल सीट वाहन चालून फिर्यादी यांना धडक देऊन जखमी करण्यास व मुक्कामार लागण्यास कारणीभूत झाला आहे. असे फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल मस्के करीत आहेत.

### अज्ञात चोरट्याने मोबाईल पळवला, गुन्हा दाखल

सोलापूर, (प्रतिनिधी) : लाल मिरची घेऊन विकण्याकरिता आलेल्या फिर्यादी बसवराज म्हेत्रे यांचा आठ हजार रुपये किमतीचा मोबाईल चोरून नेल्याची घटना ३० ते ३१ जानेवारी दरम्यान मार्केट यार्ड येथे घडली.याप्रकरणी बसवराज महादेव म्हेत्रे (वय-३८,रा.हिरेपेनुर तालुका इंडी, जिल्हा विजापूर) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल बाबर हे करीत आहे.



## सूर्योदय अर्बनएलकेपी मल्टीस्टेटच्या वतीने हळदीकुंकू कार्यक्रम संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सांगोला शहरासह सोलापूर जिल्ह्यातील उद्योग व्यवसायिकांचा आर्थिक कणा ठरलेली व महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी कटिबद्ध असलेली सूर्योदय अर्बन महिला को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड त्याचबरोबर महाराष्ट्र आणि कर्नाटक या दोन राज्यात कार्यक्षेत्र असलेली एलकेपी मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड या दोन्ही संस्थांची संयुक्त विद्यमाने सांगोला शहर आणि परिसरातील लाडक्या बहिणींसाठी आयोजित करण्यात आलेल्या हळदीकुंकू समारंभ अत्यंत उत्साही वातावरणात नुकताच संपन्न झाला.

सांगोला शहरातील नेहरू चौकामध्ये एल के पी मल्टीस्टेटच्या शाखेसमोर संपन्न झालेल्या कार्यक्रमासाठी महिला वर्गाची प्रचंड गर्दी उसळली होती यावेळी मंचावर डॉक्टर स्नेहल भोसले, डॉक्टर संगीता पिसे, लेखापरीक्षक उमा उंटवाले, मंडूच्या गोरीताई मस्के, दिपाली कोळसे पाटील पल्लवी थोरात, ज्येष्ठ मार्गदर्शिका शालन इंगवले, लता गोडसे शुभांगी लिगाडे, विद्या जाधव इत्यादी मान्यवर महिला उपस्थित होत्या.

## सोलापूर स्वराज्य पोलिस मित्र संघटना महिलांच्या वतीने हळदी कुंकू कार्यक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : स्वराज्य पोलीस मित्र पत्रकार संरक्षण आणि माहिती अधिकार संघटना सोलापूर महिलांच्या वतीने हळदी कुंकू कार्यक्रम संघटनेचे संस्थापक तथा अध्यक्ष दीपकजी कांबळे आणि.. संस्थापक तथा राष्ट्रीय मुख्य महासचिव कमलेश शेवाळे देवा आणि. महाराष्ट्र महिला अध्यक्षा धनश्रीताई उत्पात विश्वस्त उमेश जी काशीकर यांच्या मार्गदर्शनाखाली.वसोलापूरचे जिल्हाध्यक्ष दिनेश काटकर यांच्या अध्यक्षतेखाली. साजरा करण्यात आला.




हळदीकुंकवाच्या माध्यमातून आपण सुवासिनींच्या रूपात घरी आलेल्या साक्षात् आदिशक्तीचीच पूजा करत असतो. हळद आणि कुंकू लावल्यामुळे सुवासिनींमधील श्री दुर्गादेवीचे अप्रकट तत्त्व जागृत होते अन् श्रद्धापूर्वक हळद-कुंकू लावणार्या जिवासाठी कार्य करते. हळदीकुंकू करणे, म्हणजे एकप्रकारे ब्रह्मांडातील सुप्त आदिशक्तीच्या लहरींना जागृत होण्यासाठी त्यांना आवाहन करणे होय. असे प्रतिपादन या वेळी दिनेश काटकर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे आयोजन स्वराज्य सोलापूर शहर मध्य उपाध्यक्ष सपना कांबळे, शहर उपाध्यक्ष अफ्रिन बागवान, विजयालक्ष्मी कुलकर्णी, महिला संघटक -वैशाली गोरे त्यांचे सहकारी भगिनी यांच्या वतीने महिलांना निरांजन वाण देण्यात आले. या प्रसंगी सर्व शहरी विभागातुन महिला वर्ग मोठ्या संख्येन उपस्तित होत्या.

या प्रसंगी सुत्रसंचलन संपदा जोशी यांनी केले. प्रभारी इफ्तेकार कमतीकर यांनी आपल्या भाषणात हळदी कुकूंचे महत्व सांगितले. या कार्यक्रमास विश्वस्त तथा प्रसिद्धीप्रमुख उमेश काशीकर, जिल्हाध्यक्ष-दिनेश काटकर, प्रभारी-इफ्तेकार कमतीकर, शहर कार्याध्यक्ष -विनोद भोसले,संघटक -सुनील पंडित ,समन्वयक -सुनील बेंद्रे, शहर संपर्क प्रमुख -दत्तात्रय दळवी, शहर संघटक -इम्तियाज लाला आदी उपस्तिथ होते.

नक्कीच एक पाऊल महिलानी स्वराज्यच्या दिशेने उचलला याचा मनस्वी आनंद व समाधान होत असल्याचे मा.श्री. विनोद भोसले यांनी सांगुन उपस्थितीत सर्वांचे आभार मानले.

## हायटेक इंग्लिश स्कूल येथे हळदी कुंकू कार्यक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा/प्रतिनिधी : उमरगा तालुक्यातील येणेगूर येथील हायटेक इंग्लिश स्कूल येथे मकरसंक्रांतीनिमित्त महिलांसाठी हळदी कुंकू समारंभाचे अयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास परिसरातील महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या कार्यक्रमासाठी उपस्थित संस्थेच्या अध्यक्षा सुकुमारबाई जकेकुरे, येणेगूर ग्रामीण आरोग्य केंद्रातील मुख्यअधिकारी कु. साळुंके, येणेगूर सरपंच सौ.रेखा गुंजोटे, शाळेच्या प्राचार्या कु. सरस्वती मोरे, यांच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला.

कार्यक्रमाची सुरुवात माता सरस्वती व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पुजनाने झाली. या कार्यक्रमात महिला साठी होममिनिस्टर, खेळ पैठणीचा, संगीत खुर्ची, तळ्यात मळ्यात,उखाणे स्पर्धा असे विविध खेळ घेण्यात आले . व अनेक माता पालकांनी या खेळामध्ये सहभाग होऊन आनंद लुटला. स्कूल च्या वतीने उपस्थित सर्व सखी माता पालकांना तीळ गूळ वाण म्हणून पुस्तक देऊन हळदी कुंकू समारंभ साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माधुरी चेंडके व हिंगमिरे अल्का यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रतिभा पांचाळ, वर्षा सोलापूरे .सागर संध्या, स्वामी मनीषा, कु धनश्री पाटील कु. गौरी जामगे, कांबळे राणी यांनी परिश्रम घेतले.







## ईटकुर येथे जिल्हा परिषद शाळेत माजी विद्यार्थ्यांचा स्नेहसंमेलन मेळावा संपन्न

### १०वी २००१ च्या मुला मुलीकडून शाळेला कपाट प्रिंटर भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ईटकुर: सुधाकर रणदिवे, दि.३१ कळंब तालुक्यातील इटकुर येथे शुक्रवारी दि.३१ रोजी एस एस सी २००१ च्या विद्यार्थ्यांकडून तब्बल पंचवीस वर्षा नंतर शाळेत स्नेहसंमेलन कार्यक्रम आयोजित करून शाळेला कपाट प्रिंटर या दोन वस्तू देऊन आपण या शाळेत शिकल्याचे विविध विद्यार्थी व विद्यार्थिनी कडून भाषनात सांगण्यात आले.यावेळी या शाळेचे सेवावृत्ती शिक्षक व्ही बी.वाघमारे ,एस.आर . पाटील,जे.बी बोबडे, आर.बी.कवडे,एस. आर.नांदूरे,टी.सी.देटे,बी.डी. चव्हाण,गोरे सी.व्ही. तसेच मुख्याध्यापक सी.जे.शिंदे सर ए.एस.क्षिरसागर सर अंजली यादव मॅडम,आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माजी विद्यार्थी बडोदा बॅकेच मॅनेजर किरण एकशिंगे, पत्रकार श्री कृष्ण कुंभार, अभिषेक गुजर, प्रकाश आडसुळ,आतूल शिंदे, प्रकाश कोठावळे, राहुल आडसुळ,संजय पांढरे, पंडित गाडे, दादा शेंदारकर , बालाजी पूरी, बालाजी आडसुळ, हौसेराव मोरे, देवानंद माने, ब्रह्मदेव गंभीरे, महादेव मुळे, बाबासाहेब काळे, धनंजय लांडगे, राहुल तोरगले,काका नलवडे,आमोल गंभीरे, उमेश आडसुळ, विजयकुमार गवारे, विजयकुमार आडसुळ, पांडुरंग गंभीरे, किरण जोगदंड, जयराम गंभीरे, औंदूमबर गंभीरे, औंदूमबर गोडगे,पूष्पराज शिंदे, बिभीषण शेंडगे, श्रीकांत एकशिंगे, समाधान सुरवसे, बालाजी वेदपाठक, महेश जाधव, सुनिल बावळे, महेश आडसुळ,शरद आडसुळ, संपत गंभीरे तर विद्यार्थिनींमध्ये शिक्षिका सरोजिनी पोते, शितल आडसुळ,उषा गंभीरे, सारिका आडसुळ, अश्विनी पाटील,शिला माने, अर्चना कोठावळे, आदी विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**शिक्षण मंडळाच्या अनागोदी व भ्रष्ट बेकायदेशीर प्रशासनामुळे न.पा. शाळेचा शैक्षणिक दर्जा खालावला**

**तालुकाप्रमुख येताळ भगत यांची माहिती**

## नगरपालिका शिक्षण मंडळ मंगळवेढा प्रशासनाधिकाऱ्याच्या भ्रष्ट बेकायदेशीर कारभाराची चौकशी करण्यासाठी शिवसेना (उबाठा) पक्षाच्यावतीने न.पा. समोर हलगीनाद आंदोलन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सोमवार दिनांक ०३/०२/२०२५ रोजी मंगळवेढा नगरपालिका संचालित शिक्षण मंडळाच्या वतीने नगरपालिका क्षेत्रात आठ प्राथमिक शाळा चालवल्या जातात शिक्षण मंडळाच्या अनागोदी व भ्रष्ट बेकायदेशीर प्रशासनामुळे न.पा. शाळेचा शैक्षणिक दर्जा खालावला आहे याचा परिणाम शाळेतील पटसंख्या कमी होऊन पात्र शाळा पात्र होऊन शिक्षक अतिरिक्त होत आहेत शिक्षण मंडळ प्रशासन अधिकाऱ्यांचे असबे दुर्लक्ष व ढिसाळ कारभारामुळे न.पा. क्षेत्रातील कारभारामुळे न.पा. क्षेत्रातील व न.पा. संचालित मंडळाच्या शाळांमधील विद्यार्थी संख्या कमी होऊन न.पा. क्षेत्रातील खाजगी शाळा जोमात चालत आहेत व शासकीय शाळा बंद पाडण्याची अवस्थेतील आहेत अशा अनेक बाबींची चौकशी व्हावी या शासनाने याची सखोल चौकशी करावी गोर-गरीब व मजुरांच्या पाल्यांसाठी दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी शिवसेना उद्योग बाळास-ाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने नगरपालिकेच्या प्रवेशद्वारात शासनाची लक्ष वेधून संबंधितावर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यासाठी सोमवार दिनांक ३ फेब्रुवारी सकाळी ११ ते ५ हलगी नाद आंदोलन करण्यात येणार आहे असे पत्रक तालुकाप्रमुख येताळ भगत यांनी प्रसिद्ध केले आहे.

## थोडक्यात...




### किरकोळ कारणावरून मारहाण; तिघांवर गुन्हा

सोलापूर (प्रतिनिधी) किरकोळ कारणावरून मारहाण केल्याप्रकरणी तीन जणांविरुद्ध सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.हि घटना २८ जानेवारी रोजी रात्री साडेसात वाजण्याच्या सुमारास सिद्धेश्वर यात्रा येथे घडली.याप्रकरणी कृष्णा सुरेश म्यानल (वय-२८,रा.नवीन विडी घरकुल) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अनिल व इतर दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती की,फिर्यादी यांचा पाणी बॉटल व सुगंधी दूध विक्री व्यवसाय करत असताना,त्यांच्या दुकानाच्या मागील बाजूस फिर्यादी यांचा मित्र आदील याचे लहान मुलांचे वॉटर बोट तिकीट बुकिंगच्या दुकानावर वरील संशयित आरोपी यांनी दारूच्या नशेत येऊन आम्हाला देखील बोट मध्ये बसायचे आहे.असे म्हणून वाद घालत होते.त्यावेळी फिर्यादी समजावून सांगत असतात वरील संशयित आरोपी यांनी लाथा बुक्क्यांनी मारहाण करून आदिल यास कैचीने खांद्यावर व पोटावर जखमी केले आहे. असे फिर्यादीत नमूद आहे.पुढील तपास पोसई.बनकर हे करीत आहेत.

### कुंभमेळ्यासंबंधी याचिकांवर आज सुनावणी

नवी दिल्ली : उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे गंगा, यमुना आणि अदृश्य सरस्वतीच्या संगमावर सुरू असलेल्या महाकुंभासाठी जमलेल्या भाविकांच्या सुरक्षेसंबंधी सर्वोच्च न्यायालयात तीन याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. या याचिकांवर सोमवार, ३ फेब्रुवारीला सुनावणी होणार आहे. मौनी अमावस्येच्या दिवशी, २९ जानेवारीला कुंभम ेळम्यात झालेल्या चेंगराचेंगरीमध्ये किमान ३० जणांचा मृत्यू झाला असून किमान ६० जण जखमी आहेत. त्या पार्श्वभूमीवर महाकुंभाला उपस्थित राहणाऱ्या भाविकांच्या सुरक्षेची खबरदारी घेण्यासाठी निश्चित मार्गदर्शक सूचना व नियमांचे पालन करावे अशी मागणी या याचिकांमध्ये करण्यात आली आहे.

# खबरदार! दुधात भेसळ कराल तर याद राखा कायद्याची कडक अंमलबजावणी करणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा इशारा; दुध व्यवसाय विकास विभागाची आढावा बैठक

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

मुंबई/प्रतिनिधी : दुधात अजिबात भेसळ होऊ नये, ग्राहकांना शुद्ध दूध मिळावी अशीच राज्य शासनाची भूमिका आहे भेसळीत दूध मानवी आरोग्यास हानिकारक असल्याचे दूध भेसळीस आळा घालण्यासाठीच्या कायद्याची कडक अंमलबजावणी करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

सह्याद्री अतिथी ग्रह मध्ये दूध व्यवसाय विकास विभागाच्या पुढील शंभर दिवसाच्या आराखड्यांच्या अनुषंगाने मुख्यमंत्री फडणवीस यांनी आढावा घेतला.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाली की दुधातील भेसळीचा दूध उत्पादक आणि डेअरी यांनाही फटका बसतो. भेसळुक्त दुधाच्या पुरवठ्यामुळे दूध उत्पादकांना कमी दर मिळतो.

राज्यात दूध व दुग्धजन्य पदार्थांचा होणाऱ्या भेसळीवर सामान्याने प्रतिबंधात्मक कारवाई करण्यासाठी अन्न व औषध प्रशासन विभाग आणि दूध व्यवसाय विकास विभाग यांच्यामार्फत संयुक्तरित्या मोहीम राबवण्यात राबवण्यात येतील.

तसेच दूध उत्पादक वाढीसाठी प्रयत्न करण्यात यावे सीएसआर. या माध्यमातून दूध उत्पादकांना सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करावेत राष्ट्रीय डेअरी विकास मंडळ राज्यात चांगली काम करत आहे त्यांच्या माध्यमातून राज्यातील दुधाची उपलब्धता वाढवण्यावर भर द्यावा, विदर्भामध्ये दूध उत्पादनात वाढ झाली आहे आणखी वाढीसाठी काम करावे अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या यावेळी दुग्ध व्यवसाय विकास विभागाचे सचिव डॉक्टर रामस्वामी यांनी सादरीकरणाच्या माध्यमातून विभागाचा



तसेच येत्या १०० दिवसात विभागाकडून करण्यात येणाऱ्या कामाचा आराखडा मांडला.

या बैठकीत पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील, मत्स्य व्यवसाय मंत्री नितेश राणे मुख्य सचिव सुजाता सैनिक,

मदत व पुनर्वसन विभागाच्या अफर मुख्य सचिव सोनिया सेटी मुख्यमंत्र्यांचे अप्पर सचिव मुख्य सचिव विकास खारगे, मुख्यमंत्र्यांच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, मुख्यमंत्र्यांची सचिव डॉक्टर श्रीकार परदेशी, तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## श्री गुरुशांतलिंगेश्वर कॉलेज मधील बारावी विद्यार्थ्यांना निरोप




**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

दुधनी /प्रतिनिधी : अक्कलकोट तालुक्यातील दुधनी येथील श्री गुरुशांतलिंगेश्वर जुनियर कॉलेज दुधनी येथील बारावी विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आले यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी परमपूज्य डॉक्टर श्री शांतलिंगेश्वर महास्वामीजी उपस्थित होते कार्यक्रमाच्या सुरुवातीला लिंगैक्य परमपूज्य गुरुशांतलिंगेश्वर महास्वामीजींचे प्रतिमा व मातोश्री लक्ष्मीबाई म्हेत्रे यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली मान्यवरांचे स्वागत महारुद्र शेंडे यांनी केले यावेळी राजकुमार बिराजदार रामचंद्र गद्दी यांनीही आपले मनोगत व्यक्त केले यावेळी विद्यार्थ्यांमध्ये पवनकुमार कोलाटी श्रीशैल कोळी विद्याश्री बसवणकेरी सुकन्या जेवरगी आरती नाव्ही अल्फिया चिद्री फातिमा इटगी गीता कलाल स्वीटी पवार मुस्कान मुगळी आश्रफ मोटगी अंबिका खंडाळ सानिया चौधरी खुशी दोडमनी या सर्व विद्यार्थ्यांनी कॉलेज विषयी कृतज्ञता व्यक्त करत असताना शिक्षकांनी आम्हा सर्व विद्यार्थ्यांना चांगले शिक्षणाबरोबर चांगले संस्कार ही दिल्याची भावना व्यक्त केले यावेळी अध्यक्षीय भाषणात परमपूज्य डॉक्टर शांतलिंगेश्वर महास्वामीजींनी विद्यार्थ्यांनी परीक्षेला जाताना निर्भयपणाने जावे सीसीटीव्ही कॅमेरा आहे म्हणून घाबरू नये वर्षभरात केलेल्या कामगिरीचा तुम्हाला फळ नक्कीच मिळेल अशा प्रकारचा आश्वासन दिले भविष्यात विद्यार्थ्यांनी स्वावलंबी बनावे व म्हातारपणात आई-वडिलांची सेवा करावे असे कानमंत्र ही दिले यावेळी विद्यार्थ्यांनी कॉलेजला भेट वस्तूही दिले याप्रसंगी संस्थेचे सचिव महादेव खेड माजी नगरसेवक सिद्धाराम येगदी प्राचार्य सिद्धाराम पाटील सुनील आडवीतोटे शंकर देसाई बसवराज बंदराड यांच्यासह कॉलेजमधील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महारुद्र शेंडे यांनी केले तर मान्यवरांचे आभार हणमंतराव गोगाव यांनी मानले

## अन्यायग्रस्त जिल्हा परिषद शिक्षकाच्या मुलाला न्याय मिळणार का?

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

प्रतिनिधी/अहमदनगर : गेल्या वीस वर्षांपासून आपल्या हक्काच्या नोकरीसाठी संघर्ष करणाऱ्या बाळासाहेब अहिरे यांनी आता उपोषणाचा निर्णय घेतला आहे. कोपरगाव पंचायत समिती समोर हे उपोषण करण्यात येणार असून, त्यांनी संबंधित शिक्षण विभाग व प्रशासनाला जबाबदार धरण्याचा इशारा दिला आहे.



बाळासाहेब अहिरे यांचे वडील, मयत मोतीराम उमता अहिरे, जिल्हा परिषद शिक्षक होते. त्यांच्या निधनानंतर कुटुंबाला अनुकंपा तत्त्वावर नोकरी मिळावी यासाठी बाळासाहेब अहिरे यांनी अहमदनगर जिल्हा परिषद, कोपरगाव पंचायत समिती, श्रीरामपूर पंचायत समिती आणि शिक्षण विभागाकडे वारंवार पाठपुरावा केला. मात्र, गेल्या वीस वर्षांत त्यांना कोणतेही ठोस उत्तर मिळाले नाही. गटशिक्षण अधिकारी आणि जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी सातत्याने उडवा उडवीची उत्तरे देत त्यांचा अर्ज प्रलंबित ठेवला. यामुळे वैतागून बाळासाहेब अहिरे यांनी आता थेट उपोषणाचा मार्ग स्वीकारण्याचा निर्णय घेतला आहे. बाळासाहेब अहिरे यांच्या आई, मयत शकुंतला अहिरे, यांनी देखील अनेक वेळा पत्रव्यवहार केला होता. मात्र, अज्ञानाचा फायदा घेत त्यांनाही योग्य तो न्याय मिळाला नाही. आता दोन्ही पालकांना गमावलेल्या बाळासाहेब अहिरे यांच्यासमोर उपोषणाशिवाय दुसरा मार्ग राहिलेला नाही. त्यांनी माध्यमांशी बोलताना स्पष्ट केले की, एक शिक्षक विद्यार्थ्यांचे भविष्य घडवतो, मात्र त्याच शिक्षकाच्या कुटुंबाला प्रशासनाने वंचित ठेवले आहे. हे कितपत न्याय्य आहे? जर त्यांच्या मागण्या पूर्ण झाल्या नाहीत आणि त्यांच्या कुटुंबाला काही हानी पोहोचली, तर त्याला संपूर्णतः संबंधित शिक्षण विभाग आणि प्रशासन जबाबदार राहील, असा थेट इशाराही त्यांनी दिला आहे. प्रशासन यावर काय भूमिका घेणार? बाळासाहेब अहिरे यांना न्याय मिळणार का? हा प्रश्न आता सर्वांसमोर उभा राहिला आहे.

## बामसेफ, भारत मुक्ती मोर्चा बहुजन मुक्ती पार्टी व सहयोगी संघटनेच्या वतीने तालुकास्तरीय मिटींग संपन्न





**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी:अतुल सोनकांबळे

आज दि.१/०२/२०२५ रोजी बामसेफ, भारत मुक्ती मोर्चा बहुजन मुक्ती पार्टी व सहयोगी संघटनेच्या वतीने इंदापूर शासकीय विश्रामगृह मिटींग हॉल येथे इंदापूर तालुकास्तरीय महत्वपूर्ण मिटींगचे आयोजन करण्यात आले व यासाठी मा.डॉ.अनिल माने सर ( राष्ट्रीय अध्यक्ष बहुजन मुक्ती पार्टी युवा , नई दिल्ली) हे अध्यक्षता करण्यासाठी उपस्थित होते. व यावेळेस त्यांच्या हस्ते मा.महेश चव्हाण यांची (तालुकाध्यक्ष बहुजन मुक्ती पार्टी युवा इंदापूर) व मा. राजेश काशीद यांची ( उपाध्यक्ष बहुजन मुक्ती पार्टी युवा इंदापूर)यांचे नियुक्तीपत्र डॉ.अनिल माने सरांच्या हस्ते देण्यात आले.

मिटींग मध्ये एतच्च्या विरोधात व जइउची जातीनिहाय जनगणना सरकाराने करावी व अनेक महत्वपूर्ण बाबींवर जे भारत मुक्ती मोर्चा व सहयोगी संघटनेच्या वतीने ९ एप्रिल २०२५ ला जे जेलभरो आंदोलन होत आहे याबाबत व संघटनात्मक पुढील आंदोलनात्मक भुमिका यासंदर्भात डॉ.अनिल माने सर ( राष्ट्रीय अध्यक्ष बहुजन मुक्ती पार्टी युवा , नई दिल्ली)यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

### युवा तालुकाध्यक्ष पदी महेश चव्हाण यांची नियुक्तीपत्र देऊन सन्मान

मिटींग चे सुत्रसंचलन व प्रास्ताविक मा. सुमेध साबळे ( उपाध्यक्ष, बामसेफ पुणे जि. ) यांनी केले. मा. संतोष मिसाळ ( जिल्हाध्यक्ष बहुजन मुक्ती पार्टी पुणे जि. ) मा. सुभाष खरे सर ( तालुकाध्यक्ष बहुजन मुक्ती पार्टी इंदापूर ) ,मा. संतोष कांबळे ( उपाध्यक्ष भारत मुक्ती मोर्चा इंदापूर) यांनी आपले मनोगत याठिकाणी व्यक्त केले. यावेळेस मा . दादासाहेब खरात ( महासचिव बहुजन मुक्ती पार्टी इंदापूर) व सर्व बहुजन मुक्ती पार्टी चे तालुकास्तरीय पदाधीकारी, महीला वर्ग व युवा चे कार्यकर्ते जास्तीत जास्त संख्येने उपस्थित होते.

मिटींग चे आभार मा. सुभाष खरे सर यांनी मानले व मिटींग यशस्वीरीत्या संपन्न झाली.

**मोरे महाविद्यालयात सप्तरंग उत्सवात विविध स्पर्धा**

**बाळासाहेब क्षीरसागर यांचे प्रतिपादन**

# कलागुण मन व बुद्धीला सकस बनवते

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : अभ्यासाबरोबरच विद्यार्थ्यांना नम्र, शिस्तप्रिय, चपळ व ध्येयवादी बनवणारी व प्रेरित करणारी गोष्ट म्हणजे विविध कला गुण होय. खेळ व्यक्तीला मानसिक व शारीरिक दृष्ट्या प्रबळ बनवतो आणि विविध सांस्कृतिक उपक्रमातून सकस व्यक्तिमत्व घडत जाते, एकूणच वार्षिक स्नेहसंमेलनाच्या विविध स्पर्धा व उपक्रमातून विद्यार्थ्यांचे मन व बुद्धी सकस होण्यास मदत मिळते असे प्रतिपादन सभापती बाळासाहेब क्षीरसागर यांनी केले.

मविप्र समाजाचे क.ग.दा. मोरे निफाड महाविद्यालय येथे वार्षिक स्नेहसंमेलन सप्तरंग उत्सव अंतर्गत विविध स्पर्धा आयोजनाचे उद्घाटन नुकतेच पार पडले. यावेळी महाविद्यालयाच्या प्रांगणावर कार्यक्रमाचे अध्यक्ष सभापती बाळासाहेब क्षीरसागर, उद्घाटक निफाड पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक गणेश गुरव, प्राचार्य प्रोफे.(डॉ.) सुरेश जाधव, स्नेहसंमेलन प्रमुख प्रा. अभय वडघुले, सर्व विभागांचे प्रमुख व सर्व प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

उद्घाटक पोलिस निरीक्षक गणेश गुरव यांनी या वेळी विद्यार्थ्यांना शिस्त पाळावी, मोबाईलचा योग्य उपयोग करावा आणि स्वतः मधील गुणवत्ता विकसित करावी याविषयी मार्गदर्शन केले. मान्यवरांच्या हस्ते नारळ वाढवून आणि आकाशात फुगे सोडून कार्यक्रमाचे उद्घाटन संपन्न झाले.

प्राचार्य डॉ. सुरेश जाधव यांनी सप्तरंग स्नेहसंमेलन उपक्रमांची माहिती देताना अनुक्रमे दि. १ ते ०७ फेब्रुवारी या दरम्यान मैदानी क्रीडा स्पर्धा, मेहेंदी - रांगोळी - पुष्परचना, निबंध, काव्य, वक्तृत्व, वादविवाद, पारंपरिक वेशभूषा, पाककला, आनंद मेळा, साडी डे, टाय कोट डे, सांस्कृतिक कार्यक्रम सादरीकरण, शेले पागोटे वाचन, आणि गुणगौरव - बक्षीस वितरण सोहळा या सर्व आयोजित कार्यक्रमाची रूपरेषा विशद करून सर्व



विद्यार्थ्यांनी यात सहभाग होऊन यातून निखळ आनंद घ्यावा तसेच महाविद्यालयीन शिस्तीचे सर्वांनी काटेकोर पालन करावे असे आवाहन केले.

यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका, शिक्षकेतर कर्मचारी आणि बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

## कारला येथे वार्षीक स्नेहसमेहन उत्साहात साजरा

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

प्रतिनिधी/औसा : औसा तालुक्यातील कारला येथील जिल्हा परीषद प्राथमिक शाळेत वार्षीक स्नेहसंमेलन साजरा करण्यात आला ,जिल्हा परीषद शाळेतील लहान लहान चिमुकल्या विद्यार्थ्यांनी आपल्या नृत्याचे सादरीकरण करताना उपस्थीतांची मने जिंकली ,कारला ग्रामपंचायत व शालेय समितीच्या वतिने कारला गावातील नवरत्नांचा सन्मान व सत्कार सोहळा साजरा करण्यात आला.



यावेळी कारला गावचे सुपुत्र तथा सुप्रसिद्ध उद्योजक नरेंद्र रामराव काळे महावितरणचे कार्यकारी अभियंता प्रमोद वामनराव क्षिरसागर बांधकाम अभियंता ओम प्रकाश गहिनीनाथ काळे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक हनुमंत विठ्ठलराव शिंदे ज्ञानेश्वर रामराव काळे बालाजी सोनटक्के इंद्रजीत श्रीकांत निकम तलाठी विजयकुमार ऊस्तुरे ग्रामसेवक गिरी , दिनकर रामराव काळे, वल्ड रेकॉर्ड करणारी सृष्टी जगताप कारला गावचे सरपंच अलकाताई सुरेश पवार उपसरपंच किशोर काळे श्री संत मारुती महाराज सहकारी साखर कारखान्याचे संचालक विलास काळे शालेय समितीचे अध्यक्ष शिवाजीराव काळे बलभीम कुलकर्णी नागनाथ काळे उमाकांत घोडके,सुरेश पवार ,विश्वास काळे , गोविंद मुगळे बालाजी काळे नागनाथ डफडे कुंडलिक कांबळे,शाम जाधव मुख्याध्यापक माने सर सह शाळेतील शिक्षिका शिक्षक व कारला ग्रामस्थ उपस्थित होते.